महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २३१ वा | दिनांक : ०९/०७/२०२५ | वार : बुधवार

## संविधान रक्तहीन क्रांती निर्माण करण्याचे साधन : सरन्यायाधीश गवई



**मुंबई :** भारतीय संविधान हे रक्तहीन क्रांती निर्माण करण्याचे साधन असल्याचे मत भारताचे सरन्यायाधीश भूषण रामकृष्ण गवई यांनी मंगळवारी विधिमंडळात बोलताना व्यक्त केले. हे विधान करताना त्यांनी भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचा दाखला दिला. भारताची राज्यघटना ही देशात एक रक्तहीन क्रांती निर्माण करण्याचे साधन आहे असे बाबासाहेब म्हणायचे. निश्चितच आपण मागील ७५ वर्षांच्या कालखंडात याच दृष्टिकोनातून काम केले आहे, असे ते म्हणाले.

महाराष्ट्राचे सुपुत्र न्यायमूर्ती भूषण रामकृष्ण गवई यांची भारताच्या सरन्यायाधीशपदी नियुक्ती झाल्याबद्दल आज त्यांचा महाराष्ट्र विधानमंडळातर्फे सत्कार करण्यात आला. विधान भवनाच्या मध्यवर्ती सभागृहात हा सत्कार समारंभ पार पडला. यावेळी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांच्या अध्यक्षांसह मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार, विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्यासह सर्वच मंत्री व आमदार उपस्थित होते.

यावेळी बोलताना सरन्यायाधीश म्हणाले की, घटनात्मक पदावर काम करताना सुप्रीम कोर्ट असो की हायकोर्टाचा न्यायाधीश असो, तुम्हाला संविधानात नमूद मुलभूत अधिकार व मार्गदर्शक तत्वांनुसारच कार्य करणे अभिप्रेत असते. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर नेहमी म्हणायचे की, भारताची राज्यघटना या देशात एक रक्तहीन क्रांती निर्माण करण्याचे साधन आहे. निश्चितच आपण ७५ वर्षांत या दृष्टिकोनातूनच काम केले. माझ्याविषयी सांगायचे तर, मला जेव्हा केव्हा संधी मिळाली, तेव्हा -तेव्हा मी मार्गदर्शक तत्वे व मुलभूत हक्क यांच्यात संतुलन साधण्याचा प्रयत्न केला. ही तारेवरची कसरत असते. परंतु हे पद मला या देशाची व समाजाची सेवा करण्यासाठी मिळाले आहे. त्यामुळे न्यायदानात काम करण्याची संधी मिळाली तेव्हा मी ते करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला.

ते पुढे म्हणाले, मला मागील २२ वर्षांच्या कालखंडात न्यायदानाचे चांगले काम करता आले. बाबासाहेब आंबेडकर व घटनाकारांचे देशात सामाजिक व आर्थिक समानता प्रस्थापित करण्याचे स्वप्न होते. हे स्वप्न पूर्ण करण्याच्या कार्यात मला खारीचा वाटा उलचण्याची संधी मिळाली. आज आपण सर्वांनी माझा बहुमान केला. हा बहुमान महाराष्ट्राच्या १२ कोटी ८७ लाख जनतेने दिलेला सन्मान आहे. मी या जनतेला तुमच्या माध्यमातून वंदन करतो. हा सत्कार माझ्यासाठी फार महत्त्वाचा आहे. कारण, याच विधिमंडळात माझ्या वडिलांनी अनेक वर्षे लोकप्रतिनिधित्व केले. आज त्याच सभागृहात माझा सत्कार होत आहे. ही माझ्यासाठी भूषणावह बाब आहे.

सरन्यायाधीश म्हणाले, देशाच्या राज्यघटनेचा अमृत महोत्सव संपूण आपण आता शतकपूर्तीकडे वाटचाल सुरू केली आहे. कोणत्याही संविधानासाठी ७५ वर्षांचा काळ फार मोठा मानला जात नाही. पण मला अभिमानाने सांगावे वाटते की, या ७५ वर्षांच्या कालखंडात आपल्या कार्यकारी मंडळ, कायदेमंडळ व न्याय मंडळाने भारतीय संविधानाला अभिप्रेत असेच काम केले. सामाजिक व आर्थिक न्याय तथा सामाजिक व आर्थिक समानतेच्या दृष्टिकोनातून संसद व देशातील विधिमंडळांनी अनेक महत्वपूर्ण कायदे केले. त्याचा जनतेला मोठा फायदा झाला. भाडेपट्टा कायदा रद्द केल्यामअळे देसातील लाखो नागरीक ते कसत असणाऱ्या जमिनीचे मालक झाले. यामुळे गरिबांना रोजगार व उपजिविकेचे साधन मिळाले. महाराष्ट्रात महार वतन उच्चाटन कायदा आहे. या कायद्यांतर्गत महार वतन असणाऱ्या वतनदारांना जमिनीचे मालक होता आले.

या देशात महिला सर्वाधित मागास असल्याचे बाबासाहेब नेहमीच म्हणायचे. त्या महिलांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी क्रांतिसूर्य ज्योतिबा फुले व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनी शिक्षणाची कवाडे खुली केली. त्यानंतर संपूर्ण देशात एक क्रांती झाली. त्यामुळे आज कोणत्याही क्षेत्रात महिला अग्रेसर आहेत. या देशाला महिला पंतप्रधान मिळाल्या. २ महिला राष्ट्रपती मिळाल्या. पहिल्या महाराष्ट्राच्या प्रतिभा पाटील व दुसऱ्या विद्यमान राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू. आदिवासी समाजाचा अजून राष्ट्रपती झाला नव्हता. पण भारतीय संविधानामुळे हे शक्य झाले. या देशाचे अनुसूचित जातीचे २ व्यक्ती के आर नारायण व रामनाथ कोविंद हे ही भारताचे प्रथम नागरीक अर्थात राष्ट्रपती झाले. अनुसूचित जातीचेच बालयोगी व मीराताई लोकसभेचे सभापती झाले. अनेक मुख्य सचिव व पोलिस महासंचालक या वंचित समाजातून झालेत. त्यानंतर आज बाबासाहेबांच्या विचारांचा पाईक म्हणून मला सर्वोच्च न्यायालयाचे नेतृत्व करण्याची संधी मिळाली हे मी माझे भाग्य समजतो, असे सरन्यायाधीश म्हणाले.

## मंत्री भरत गोगावले येताच विरोधक म्हणाले 'ॐ फट स्वाहा'



**मुंबई :** राज्य विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन सध्या विधानभवनात सुरू आहे. या अधिवेशनात विरोधकांनी विविध मुद्यांवरून सरकारला चांगलेच घेरले आहे. आज विधानभवनाच्या पायऱ्यांवर विरोधी पक्षाच्या नेत्यांनी घोषणाबाजी केली. विरोधकांची घोषणाबाजी सुरू असताना मंत्री भरत गोगावले आले, तेव्हा शिवसेना ठाकरे गटाचे भास्कर जाधव यांनी "ॐ फट स्वाहा", अशी घोषणाबाजी केली.

शिवसेना शिंदे गटाचे नेते व मंत्री भरत गोगावले विधानभवनात जात असताना विधानभवनाच्या पायऱ्यांवर विरोधी पक्षाचे नेते आंदोलन करत होते. भरत गोगावले यांना पाहताच त्यांनी 'ॐ फट स्वाहा', अशी घोषणाबाजी करण्यास सुरू केले. यावेळी शिवसेना ठाकरे गटाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी देखील भरत गोगावले यांची नक्कल करून दाखवली. विरोधकांनी गोगावले यांची चांगलीच मजा घेतल्याचे यावेळी दिसून आले.

शिवसेना ठाकरे गटाचे नेते वसंत मोरे यांनी भरत गोगावले यांच्यावर गंभीर आरोप केले होते. वसंत मोरे म्हणाले होते की त्यांनी विधानसभा निवडणुकीपूर्वी आपल्या घरी अघोरी पूजा केली होती. तसेच १८ ऑक्टोबर २०२४ रोजी भरत गोगावले यांनी उज्जैन येथील बागलामुखी देवीच्या मंदिरात ११ महाराजांसोबत पूजा केली. त्यानंतर आपल्या घरी बोलावून पूजा घातली होती. १७ ऑक्टोबर २०२४ रोजी बागलामुखी मंदिरातून पुजारी कशाला आणले होते, ज्या पूजा घातल्या त्या कशाला घातल्या? ११ पुजारी बोलावून त्यांच्याकडून कशाला पूजा केल्या. बाहेर राज्यातून मांत्रिक आणायचे आणि पूजा घालायच्या. निवडणुकीपूर्वी गोगावले यांच्या घरी अघोरी पूजा कशाला घातल्या. ॐ फट स्वाहा जे करतात त्यांना आणले जाते. महाराष्ट्रातले अनेक नेते तिथे जातात, १५ लाख रुपये एका पूजेला लागतात, असा गौप्यस्फोट वसंत मोरे यांनी केला होता.

पावसाळी अधिवेशनात बोलताना शिवसेना ठाकरे गटाचे नेते अनिल परब यांनी देखील रायगडमध्ये अघोरी प्रकार सुरू असल्याची टीका करत भरत गोगावले यांच्यावर निशाणा साधला होता. तसेच त्यांनी लाडक्या बहिणींच्या सुरक्षेसाठी लिंबू मिर्ची सुद्धा आणली होती.

## रायगडच्या पालकमंत्रीपदावरून महायुतीत वाद : शिंदेंच्या आमदारांची फडणवीसांवर नाराजी

**कर्जत :** रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदावरून महायुतीतील पक्षांमध्ये गंभीर वाद निर्माण झाला आहे. शिवसेनेचे कर्जत विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेंद्र थोरवे यांनी थेट उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर नाराजी व्यक्त केली आहे. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना अदिती तटकरे यांना हे पद मिळाले होते, असे थोरवे यांनी म्हटले आहे. दुसरीकडे, भाजपकडूनही या टीकेला जोरदार प्रत्युत्तर देण्यात आले असून, देवेंद्र फडणवीसांचा काही संबंध नाही. त्यांना दुषण देऊ नये, असे भाजपचे जिल्हा सरचिटणीस दीपक बेहरे म्हणाले.

या आधी शिवसेना राष्ट्रवादी काँग्रेसवर टीकेची तोफ डागत होती. पण आता थेट देवेंद्र फडणवीस यांच्यावर निशाणा साधल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. त्यामुळे या मुद्याचे पडसाद पावसाळी अधिवेशनातही उमटण्याची शक्यता वर्तवली जात आहे. दरम्यान, रायगडचे पालकमंत्रिपद मंत्री भरत गोगावले यांना द्यावे, अशी स्पष्ट आणि सार्वजनिक मागणी एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेने केली आहे. गोगावले यांना जिल्ह्याचा चांगला अनुभव आहे आणि स्थानिक समस्या समजून घेण्याचे त्यांचे बळ आहे, असे पक्षाकडून सांगितले जात आहे.

कर्जत येथे आषाढी एकादशीचा धार्मिक सोहळा आटोपल्यानंतर माध्यमांशी संवाद साधताना आमदार महेंद्र थोरवे यांनी आपली नाराजी व्यक्त करत म्हटले, "उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना अदिती तटकरे यांना रायगडच्या पालकमंत्रिपदाची जबाबदारी देण्यात आली होती. आता मात्र भाजप सरकार असूनही, शिवसेनेच्या आमदारांना हे पद मिळत नाही, हे अत्यंत दुर्दैवी आहे."

यासोबतच महेंद्र थोरवे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसवरही टीका केली. "रायगड जिल्ह्याच्या विकासासाठीचा निधी अदिती तटकरे यांच्या माध्यमातून दुसऱ्या भागांत वळवला जातोय. आमच्यासारख्या शिवसेनेच्या आमदारांना दुय्यम वागणूक दिली जात आहे." असा आरोपही थोरवे यांनी केला आहे.

शिवसेनेच्या या टीकेवर भाजपकडूनही तितक्याच तीव्रतेने प्रतिक्रिया देण्यात आली. भाजपचे जिल्हा सरचिटणीस दीपक बेहरे यांनी पक्षाची भूमिका मांडली आहे. रायगडमध्ये सर्वाधिक आमदार भारतीय जनता पक्षाचे आहेत. पालकमंत्री भाजपचा हवा होता. मात्र भाजप पक्ष धोरण मानतो. आमदार थोरवे यांनी केलेले वक्तव्य चुकीचे आहे. त्यांना रायगडचे पालकमंत्री पद मिळवून देण्यात एकनाथ शिंदे कमी पडले. त्यांनी त्यांची तुलना उद्धव ठाकरे यांच्याबरोबर करायला हवी होती. त्यात देवेंद्र फडणवीस यांचा काही संबंध नाही. त्यांनी देवेंद्र फडणवीस यांना दुषण देऊ नये, असे दीपक बेहरे यांनी म्हटले आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०९ जुलै २०२५


## हिंदू-मुस्लिम ऐक्य आणि सलोख्याचे प्रतीक असलेला मोहरम सण किनगाव राजा येथे रविवारी उत्साहात साजरा करण्यात आला



**किनगावराजा (महेश मुंढे) :** हिंदू-मुस्लिम ऐक्य आणि सलोख्याचे प्रतीक असलेला मोहरम सण किनगाव राजा येथे रविवारी पारंपरिक उत्साहात साजरा करण्यात आला. गावाशेजारी असलेल्या शंकर महाजी हरकळ यांच्या शेतातील मौलवी बाबा दर्गा परिसरात या धार्मिक उत्सवाचे आयोजन करण्यात आले. दर्याचे परंपरागत पूजारी व्यंकटराव आनंदराव हरकळ यांनी विधीवत पूजा-अर्चा केली. तीन दिवस ढोल-ताशे आणि नगाऱ्यांच्या गजरात पार पडलेल्या या उत्सवात सर्व धर्मीयमहिला आणि पुरुषांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून दर्शन घेतले आणि श्रद्धेने नवस अर्पण केले. अनेक महिलांनी उपवास धरून अगरबत्ती, उद अर्पण करत दर्यावर नवस केला. दरवर्षीप्रमाणे यंदाही डोले पारंपरिक पद्धतीने सजवले गेले होते. दर्यावर आकर्षक सजावट करण्यात आली होती आणि दर्शनासाठी नागरिकांची मोठी गर्दी उसळली होती. हरकळ कुटुंबीयांच्या पुढाकाराने हा उत्सव यशस्वीपणे पार पडला. मोहोरम च्या निमित्ताने किनगाव राजा येथे एकदा हिंदू-मुस्लिम ऐक्य सुंदर परंपरा अनुभवायला मिळाली.

## सैराट फेम प्रदीप उर्फ लंगड्या तानाजी गलगुंडे याची दौलताबाद देवगिरी किल्ल्यावर भेट



**पडेगाव (प्रा. शिवाजी गायकवाड) :** तानाजी पर्यटन मित्र असून त्याला पर्यटनाची आवड असल्याने सतत तो पर्यटन करत असतो दि ०८ मंगळवारी सकाळी देवगिरी किल्लावर त्याने भेट दिली त्याने किल्ल्यावर सरस्वती विहीर, हाथी हौद, भारतमाता मंदिर, चांदमीनार, काळाकोट, चिनी महल, मेंढा तोप, अंधेरी, गणपती मंदिर, बारादरी, दुर्गा तोप या ठिकाणी भेट दिली. त्याला शेख जावेद यांनी मार्गदर्शन (गाईड) केले पर्यटनासाठी आलेल्या पर्यटकांनी तानाजी याला ओळखल्या नंतर त्याच्या सोबत महाविद्यालयीन विध्यार्थीनी ,विद्यार्थी यांनी फोटो सेल्फी काढून घेतले तर लहान विद्यार्थ्यांनी फोटो घेत सैराट मधील डायलॉग घ्यायला सांगितले तानाजी ने परश्या आर्ची आली रे हे म्हणून लहान मुलांना खुश केले भविष्यात लवकरच माझें चित्रपटे प्रदर्शित होणार असून परत एकदा आर्ची व परश्या सोबत चित्रपट करण्याची इच्छा व्यक्त केली आहे. किल्ल्यावर स्वच्छता व सफाई सुरक्षा व्यवस्था विषयावर समाधान व्यक्त केले आहे पत्रकार संघाच्या वतीने तानाजी यांचे अमीर शेख, अभय विखणकर, राजेश थोरात, शिवाजी अस्वार, किशोर पाटील, जगनाथ भगत, पंकज लकडे यांनी त्याचे स्वागत केले.






## राज्यशास्त्र संशोधन केंद्रात रघुनाथ महामुनी लिखित गोमाता काव्यसंग्रहाचे प्रकाशन



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** येथील सेवानिवृत्त मुख्याध्यापक तथा साहित्यिक कविवर्य रघुनाथ ज. महामुनी कोंढेजकर लिखित गोमाता काव्यसंग्रहाचे श्री माधवराव पाटील महाविद्यालयाच्या राज्यशास्त्र पदवी-पदव्युत्तर व संशोधन केंद्रात मंगळवारी (ता.८) रोजी मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. यावेळी प्रमुख अतिथी तुळजापूरच्या यशवंतराव चव्हाण महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. आंबादास बिराजदार, नळदुर्गच्या कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाचे राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. निलेश शेरे, भौतिकशास्त्र विभागाचे प्रा. डॉ. सतिश शेळके, रोटरी क्लब मुरूम सिटी चे अध्यक्ष प्रा. डॉ. आप्पासाहेब सूर्यवंशी, वाणिज्य विभागाचे प्रा. डॉ. सुधीर पंचगल्ले, राज्यशास्त्र संशोधन केंद्राचे समन्वयक प्रा. डॉ. महेश मोटे आदींच्या प्रमुख उपस्थितीत काव्यसंग्रहाचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी डॉ. बिराजदार म्हणाले की, हा काव्यसंग्रह म्हणजे अनुभवाच्या सागरातून उमटलेले अमूल्य मोती आहेत. त्यातील प्रत्येक कविता एक विचार देणारी आहे. वाचकांना या कवितांमधून केवळ सौंदर्याची अनुभूती मिळत नाही, तर जीवनाकडे पाहण्याचा नवा दृष्टिकोन मिळतो.

या कविता केवळ वाचायच्या नाहीत, तर अनुभवल्या पाहिजेत. प्रकाशन कार्यक्रमाचे प्रास्ताविक तुळजापूरचे सचिन घाटे यांनी केले. सूत्रसंचालन शिवतेज भोसले तर आभार अमोल कटके यांनी मानले. यावेळी बहुसंख्येने विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०९ जुलै २०२५


## इंदिराबाई भास्करराव पाठक महिला महाविद्यालयात आपत्ती व्यवस्थापन कार्यक्रम घेण्यात आला.



**छत्रपती संभाजीनगर :** महाविद्यालयातील आपत्ती व्यवस्थापन विभागातर्फे आयोजित कार्यक्रमात छत्रपती संभाजीनगर शहरातील अग्निशामक दलाचे अधिकारी व कर्मचारी अग्निशामक बंबांसह उपस्थित होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. सुनिता बाजपाई , अग्निशामक विभागाचे अधिकारी मा. विनायक लिमकर ,फायरमॅन संग्राम मोरे ,राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. अन्विता अग्रवाल ,कनिष्ठ महाविद्यालयाच्या पर्यवेक्षिका प्रा. माधुरी भावसार यांची व्यासपीठावर उपस्थिती होती.आपत्कालीन परिस्थितीमध्ये विद्यार्थी -विद्यार्थिनी , प्राध्यापक व कर्मचारी यांनी स्वतःचा बचाव कसा करावा व लागलेल्या आगीचे नियंत्रण कशाप्रकारे करावे, या संदर्भात मार्गदर्शन करण्यात आले.यावेळी संग्राम मोरे यांनी आग लागण्याचे पाच प्रकार सांगितले .कोणत्या प्रकाराला कोणत्या स्वरूपाचे अग्निशामक वापरायचे याची सविस्तर माहिती दिली.त्यानंतर अग्निशामकाचे प्रात्यक्षिक दाखविले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सिद्धार्थ शिंदे यांनी केले तर आभार प्रा. ज्योती मंठाळकर यांनी केले. यावेळी अग्निशामक दलातील दिनेश मुंगसे ,नंदकिशोर घुगे, अजिंक्य भगत तसेच विद्यार्थी, विद्यार्थिनी ,प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.






## सामाजिक,पत्रकारिता, कार्यक्षम नेतृत्व क्षेत्रातील "कर्मजीत" पुरस्काराने डॉ. रामलिंग पुराणे सन्मानित



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** सामाजिक कार्यकर्ते तथा बसव प्रतिष्ठाण अध्यक्ष डॉ.रामलिंग पुराणे यांना सामाजिक बांधिलकी, कार्यक्षम नेतृत्व आणि पत्रकारितेच्या माध्यमातून सामाजिक सजगतेची दखल घेऊन पुणे येथील जनकल्याण बहुउद्देसिय फाऊंडेशन व आशुतोष डान्स स्टुडिओ यांच्या संयुक्त विद्यमाने मान्यवरांच्या हस्ते "कर्मजीत" पुरस्काने सन्मानित करण्यात आला. दि. ०४ जुलै रोजी पुणे येथील साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे सभागृहात आयोजित कार्यक्रमात डॉ. पुराणे यांना सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळ व नाट्य परिषद अध्यक्ष मेघराज राजेभोसले,पोलीस उपायुक्त शहाजीरावं पाटील,संजवोनी बालगुडे,आयोजक आशुतोष शंकये पाटील आदी मानायवरांची उपस्थिती होती. सामाजिक बांधिलकी, कार्यक्षम नेतृत्व आणि पत्रकारितेच्या माध्यमातून सामाजिक सजगता निर्माण करणाऱ्या व्यक्तिमत्त्वांचा राज्यस्तरीय सन्मान करण्याच्या प्रेरणेने आयोजकाच्या वतीने "कर्तृत्ववान पुरस्कार सोहळा २०२५" आयोजित करण्यात आला होता. या गौरवस्पद सोहळ्यात, समाजहितासाठी सतत कार्यरत असलेल्या आपल्या योगदानाची योग्य दखल घेत, "कर्मजीत पुरस्कार - २०२५" आयोजन करण्यात आले होते, डॉ. पुराणे एक सक्रिय सामाजिक कार्यकर्ते, दृढ संघटनात्मक नेतृत्वकर्ते, आणि सजग पत्रकार म्हणून गेली अनेक वर्षे राष्ट्राच्या विविध भागांमध्ये समाजातील गरजू, उपेक्षित, आणि वंचित घटकांपर्यंत आवाज पोहोचवण्याचे कार्य करत आहेत. त्यांची संघटनात्मक धोरणांवरील उत्कृष्ट पकड, भक्कम विचारधारा, आणि सामाजिक चळवळीतून निर्माण केलेली जागरूकता ही समाजासाठी आशेचा किरण ठरली आहे. "कर्मजीत" या नावाचा अर्थच आहे आपल्या कर्तृत्वाने जीवनावर विजय मिळविणे. "कर्मजीत पुरस्कार" हा केवळ एखाद्या यशस्वी व्यक्तीचा गौरव नाही, तर तो समाजासाठी न थकता, न थांबता कार्य करणाऱ्या कर्तृत्वशील जीवनदृष्टिकोनाचा सन्मान आहे आणि या सन्मानाचे डॉ. पुराणे हे योग्य अधिकारी असल्याचे दखल घेत त्यांना सन्मानित करण्यात आला आहे. डॉ.पुराणे यांचे सामाजिक कार्याबरोबर संघटनात्मक धोरण,पत्रकारिता क्षेत्रात पकड मजबूत आहे, पन्नासहुन अधिक आंदोलनाच्या माध्यमातून त्यांनी जनसामान्यांना न्याय मिळवून दिला आहे. त्यांचे अनेक आंदोलने राज्य आणि देश पातळीवर गाजले आहेत. डॉ.पुराणे यांना सामाजिक कार्यातील डॉक्टरेट पदवी ही प्राप्त झाली आहे. नुकतेच त्यांना श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ अक्कलकोट संस्थाच्या वतीने "गुणीजन गौरव" पुरस्कार ही जाहीर झाला आहे. त्यांना आतापर्यंत शिवछत्रपती महाराष्ट्र गौरव पुरस्कार, समाजभूषण, समाजचिंतक, समाजरत्न, कोरोना योद्धा, जननायक, लोकतंत्र के प्रहरी, पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र समाजरत्न असे अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे.

## माळीवाडा येथील महात्मा फुले विद्यालयात कदीर बशीर शेख यांच्या सेवानिवृत्ती निमित्त सेवा गौरव सोहळा पार पडला




**दौलताबाद (जावेद अहमद) :** कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वसंत शैक्षणिक संस्थेचे डॉ. वैजिनाथ आढाव हे होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून माळीवाडा गावच्या सरपंच ज्योती ताई मुळे, उपसरपंच मनेश गाजरे, माजी सरपंच अनिता ताई हेकडे, ग्रामपंचायत सदस्य कडुभाऊ कीर्तीकर, प्रवीण बर्डे,धम्मपाल गायकवाड, नंदकिशोर मुळे , सुधाकर हेकडे, गणेश आस्वार, सुरेंद्र जगधणे, पोलिस पाटील प्रमोदजी साठे, आदींची उपस्थिती होती. सर्व मान्यवर व विद्यालयातील सर्व कर्मचाऱ्यांनी सत्कार मूर्ती शेख सर व त्यांच्या पत्नी शबाना शेख यांचा हार,शाल,श्रीफळ व भेटवस्तू देऊन भव्य सत्कार केला.याप्रसंगी गोरे सर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक सादर केले, सरोज देवरे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.विद्या भंगड, गायत्री गाजरे, सलोनी साठे या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले.प्रमुख पाहुणे आणि अध्यक्षांनी भाषणं केली कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चरण जारवाल यांनी तर आभार आशा गाडेकर यांनी मानले कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संजय गायकवाड, मुरली घोगरे,दिपक गाणार, रवी खोडाळ, किर्ती घोगरे, वैशाली मुधोळकर, सुमन देवतकर, जयश्री कोलते,सुनिल महाजन, कैलास पल्हाळ आदींनी परिश्रम घेतले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०९ जुलै २०२५


## साताऱ्यात भरदिवसा विवाहितेची गळा चिरून हत्या



**सातारा** : साताऱ्यातील शिवथर गावात भर दुपारी घरात एकटी असलेल्या 25 वर्षीय विवाहितेची गळा चिरून निर्घृण हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. पूजा प्रथमेश जाधव असे मयत विवाहितेचे नाव असून, या प्रकरणात पोलिसांनी गावातीलच 28 वर्षीय संशयित युवकाला ताब्यात घेतले आहे. प्राथमिक तपासात ही हत्या एकतर्फी प्रेमातून झाल्याचे समोर आले आहे.

सोमवारी दुपारी पूजा जाधव घरी एकटी होती. तिचे पती प्रथमेश जाधव मुलाला शाळेत सोडून कामावर गेले होते, तर सासू-सासरे शेतात गेले होते. घराचे सर्व दरवाजे उघडे असल्याने शेजारी राहणाऱ्या एका आजीनं घरात डोकावलं असता रक्ताच्या थारोळ्यात विवाहितेचा मृतदेह दिसून आला. त्यांनी तत्काळ आरडाओरडा करत शेजाऱ्यांना बोलावलं.

घटनेची माहिती मिळताच साताऱ्याचे डीवायएसपी राजीव नवले, सहाय्यक पोलिस निरीक्षक मोर्डे, महसूल अधिकारी विशाल पवार आणि श्वान पथक तातडीने घटनास्थळी पोहोचले. पंचनामा करून मृतदेह क्रांतिसिंह नाना पाटील जिल्हा रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला.

या प्रकरणी पोलिसांनी शिवथर येथीलच 28 वर्षीय तरुणाला ताब्यात घेतले असून, प्राथमिक तपासात या तरुणाचे विवाहितेशी एकतर्फी प्रेमसंबंध होते. तिच्याकडून प्रेमास नकार मिळाल्याने संशयिताने संतापातून घरात घुसून तिच्या गळ्यावर धारदार शस्त्राने वार करून हत्या केल्याचा पोलिसांचा प्राथमिक अंदाज आहे.

पोलिस उपअधीक्षक राजीव नवले यांनी सांगितले की, संशयित ताब्यात आहे. प्रेमातून खून झाल्याचं निष्पन्न होतंय. लवकरच गुन्हा उघडकीस आणला जाईल. सध्या पोलिसांकडून अधिक चौकशी सुरू असून, गुन्ह्याच्या तपशीलांचा शोध घेतला जात आहे.

## तिफण - लोकवाद्ये विशेषांक
### साहित्य पाठविण्याचे आवाहन



**कन्नड (प्रतिनिधी)** : भाषा, साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक तिफण हे सातत्याने नाविण्यपूर्ण विशेषांक प्रसिद्ध करीत असते. महाराष्ट्रात व महाराष्ट्राबाहेर विविध प्रकारची लोकवाद्ये वाजविली जातात.सण, उत्सव, यात्रा, लग्न प्रसंगी, मर्तिकाची, विविध देवदेवतेची, धर्माची तसेच जाती-जमातीची अशी अनेक पारंपरिक लोकवाद्ये आजही पहावयास मिळतात.ही लोकवाद्ये आजही आपले स्वतंत्र अस्तित्व व वेगळेपण जपून आहेत. ही लोकवाद्ये वाजविण्याची पद्धतही स्वतंत्र आहे. आजही ही लोकवाद्ये आपणास भूरळ टाकतात.प्रत्येक लोकवाद्याचे ताल, ध्वनी, सूर, हे भारावून टाकणारे असतात. या सर्व लोकवाद्यांची एकत्रित माहिती उपलब्ध व्हावी, त्याचे संकलन होऊन त्यांचा अभ्यास व्हावा, तसेच ही लोकवाद्ये वाजविणारे लोक कलावंत (जे आजही दुर्लक्षितच आहेत) या सर्वांची दखल घेऊन ती समाजासमोर यावीत या महत्वपूर्ण उद्देशाने त्रैमासिक तिफण तर्फे लोकवाद्ये विशेषांक प्रसिद्ध करण्यात येणार आहे.लोकवाद्याचा इतिहास, परंपरा, वाजविण्याचे कौशल्य, लोकवाद्ये वाजविणारे लोककलावंत, विशिष्ट प्रसंगी वाजविले जाणारे लोकवाद्य तसेच विविध जाती-जमातीची लोकवाद्ये, त्यांच्या मुलाखती, लोकवाद्यावरील कविता, कथा, ललित, रिपोर्ताज यासंबंधी सविस्तर माहिती असणारे स्वलिखित लेख, संबंधित छायाचित्रासह tifanprakashan2024@gmail.com या ईमेलवर जून २०२५ पर्यंत युनिकोड, वर्ड फाईल फाँड साइज १२ ,A4 साईजमध्ये शुद्धलेखनासह पाठवावा. सोबत लेखकांचाही पासपोर्ट फोटो पाठविणे आवश्यक आहे. लेख चार ते पाच पानांचा असावा.काही लोकवाद्यांची यादी आपल्या अवलोकनार्थ :ताऱ्या, मांजरी, नंगोरा, तुडूम, कुंडीळ, डफरी, किंगरी, संबळ, दिमडी, सुंद्री, हलगी, ढोलकी, घुमट, मृदंग, टिपरी, तारपा, पावरी, सुंदरी, भेरी, घांगळी, बुलबुल, वीणा, डमरू, शंख, बासरी, घंटा, काशाची थाळी, नगारा, तुतारी, टाळ, बिगुल, पुंगी, सतार, खंजेरी, सनई, चिपळ्या, खुळखुळा, तुणतुणे, तबला, ढोल, डफ, ताशा, घुंगरू, एकतारी ईत्यादी. तरी आपण आपले साहित्य उपरोक्त ईमेलवर पाठवून या उपक्रमात सहभागी व्हावे.

**डॉ. शिवाजी हुसे**
**संपादक,**
**तिफण मो.९४०४०००३९८**


प्रवेश सुरू

डी.एम.एल.टी.

P.G.DMLT

फिजोओथेरिपी

डिप्लोमा ऑप्थोमेट्री

OT टेक्नीशियन

X-Ray, ECG

रेडीओलॉजी

संपर्क

9405109103


## मुद्रण व्यवसायात तंत्रज्ञानाचा स्वीकार करा : डॉ. गोडबोले



**पुणे** : कोणत्याही व्यवसायात स्थित्यंतराचा काळ हा येत असतोच. इंडस्ट्री १.० पासून सुरू झालेला प्रवास इंडस्ट्री ४.० पर्यंत येऊन ठेपलेला आहे. या काळात प्रिंटींग व्यवसायावर देखील परिणाम झाला असून प्रिंटींग व्यावसायिकांनी काळाची पाऊले ओळखून तंत्रज्ञानाचा अवलंब करावा, असे मत ज्येष्ठ तंत्रज्ञ आणि लेखक डॉ. अच्युत गोडबोले यांनी व्यक्त केले. दि पूना प्रेस ओनर्स असोसिएशनच्या १०६ व्या वर्धापन दिन समारंभानिमित्त आयोजित पुरस्कार वितरण सोहळ्या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. अच्युत गोडबोले बोलत होते.

भावे प्राथमिक शाळेच्या सभागृहात झालेल्या या कार्यक्रम प्रसंगी मुद्रण क्षेत्रात दीर्घकाळ तपश्चर्या केलेले ज्येष्ठ मुद्रक सुरेंद्र सावळे आणि सु. वा जोशी यांना 'मुद्रणकला जीवनगौरव पुरस्कार' प्रदान करून सन्मानित करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष नवी दिल्ली येथील ऑल इंडिया फेडरेशन ऑफ मास्टर प्रिंटर्सचे (एआयएफएमपी) अध्यक्ष सतीशकुमार मल्होत्रा, एआयएफएमपी पश्चिम विभागाचे उपाध्यक्ष संजय घटवाई, दि पूना प्रेस ओनर्स असोसिएशनचे अध्यक्ष राहुल मारूलकर, उपाध्यक्ष कृष्णा जागडे, चिटणीस किशोर गोरे आणि विनय कळसकर आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना डॉ. अच्युत गोडबोले म्हणाले की, इंडस्ट्री १.० ते इंडस्ट्री ३.० चा प्रवास तुलनेने कमी गतीचा होता, पण इंडस्ट्री ४.० मध्ये बदलाचा वेग अफाट आणि प्रचंड आहे. तंत्रज्ञानाचा प्रवास प्रिंटींगकडून डीजीटलकडे होत आहे. अशावेळी आपल्या प्रिंटींग व्यवसायापुढे आगामी पाच वर्षात नेमकी कोणती आव्हाने उभी राहणार आहेत, याचा आपण आत्तापासूनच विचार करणे आवश्यक आहे. कृत्रिम बुध्दीमत्ता, चॅट जीपीटी यासारख्या डिजीटल व्यासपीठांमुळे प्रिंटींग व्यवसायावर नकारात्मक परिणाम होत आहे. मानवी कौशल्यांपेक्षा तांत्रिक कौशल्यांवर भर वाढत आहे. आपल्या आधीची पिढी आणि आपली पिढी प्रिंटींग साहित्यावरच वैचारिकदृष्ट्या जोपासली गेली. परंतु, अलीकडची पिढी डिजीटलवर भर देणारी आहे. प्रिंटींग व्यवसाय एकदम बंद पडणार नसला तरी कामाच्या स्वरूपात मात्र अमूलाग्र बदल होणार आहेत. कृत्रिम बुध्दीमत्तेने कृषी, वैद्यकीय, अभियांत्रिकी, हाऊस किपींग यासारखी सर्वच क्षेत्रे व्यापली आहेत. तंत्रज्ञानाकडे दुर्लक्ष न करता, त्याच्याशी जुळवून घेण्याशिवाय गत्यंतर नाही. संगणकीय क्रांती किंवा वर्ल्ड वाईड वेब या तंत्रज्ञानामुळे नोकऱ्या जातील अशी शक्यता वर्तवली जात होती. मात्र, त्या तंत्रज्ञानाचा विशेष परिणाम जाणवला नाही. मात्र, एआय आणि चॅट जीपीटी हे तंत्रज्ञान 'डीप रूटेड' असल्याने वेळीच सावध होणे आवश्यक आहे.

सतीशकुमार मल्होत्रा म्हणाले की, एआय आणि चॅट जीपीटी हे तंत्रज्ञान आपल्या उद्योगावर परिणाम करणारे असले तरी आपण घाबरून न जाता त्यात दडलेल्या संधींचा शोध घेणे आवश्यक आहे.